विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित

# मुंगसाजी महाराज महाविद्यालय

दारव्हा जि. यवतमाळ



# वसुंधरा

वार्षिकांक

२०२५-२०२६

# Inspiration



*Late Balasaheb Ghuikhedkar*
Founder President
Vidya Prasarak Mandal Darwha

**Vishwas Alias Balasaheb Ghuikhedkar** Was born on 10th Jan 1933, and died on 28th June 1997. It's ourhonour to give brief introducation of our founder president Hon'ble Balasaheb Ghuikhedkar. Balasaheb, as well as Known as the man of Co-Operative and political sector but its' not enough to say about him.

**Balasaheb as a...**

Successful man occupied presidential office for almost 40 Years. Also Direcctor of World Co-operative alliance Geneva In first Term 1960 to 1980 and 1986 to 1994.

He was given the responsibility of the President of National Co-Operative Alliance' Held in Tokyo (Japan) from 23rd to 30 th Oct. 1992.

Once again he was nominated as a President of Maharashtra State Co-Op. Agriculture, Rural Bank, In 1993 he was nominated as a Represntative Director of M.S. Co- op. Bank, Mumbai.

He attended seminar from 7th to 10th September, 1993 of International Co-Op. Federation at Geneva (Switzerland) Balasaheb was independently elected as an MLA of Darwha Constituency.


He Started Vidya Prasarak Mandal, Darwha in 1971 as a educational Institution and under this he started Mungsaji Maharaj Mahavidhyalaya, Junior and senior college of Arts, commerce and science. Then it progresses and now we have MCVC, B.P.Ed., D.Ed., Nursing school in the same premises.

Balasaheb as reporter, writer, poet, farmer, co-Operative person, political personality means he was a multidimensional man but we remember him as a guide and true human being. We pay tribute to this solomen personality.

विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित

# मुंगसाजी महाराज महाविद्यालय

## दारव्हा जि. यवतमाळ




**● प्रभारी प्राध्यापक/ संपादक मंडळ**

डॉ. संतोष व्ही. चतुर
(कला शाखा व मराठी विभाग प्रमुख)
प्रा. यश पवार
प्रा.सौ. शारदा धोटे

**● मुद्रक**

**निलेश प्रकाश दंतवार**
श्री डिजीटल पुसद 9403333341

# वसुंधरा

**वार्षिकांक**

**२०२५-२०२६**

(या वार्षिकांकात प्रकाशित झालेल्या साहित्याशी व मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

# वसुंधरा

वार्षिकांक

२०२५-२०२६

## अंतरंग



### ● मनोगत :


अध्यक्ष, संपादकीय, प्राचार्य,
महाविद्यालयीन शिक्षक वृंद,
अभिनंदन,


### ● लेख


* अहंकार * बैलपोळा * वसुंधरा
* महाविद्यालयातील पोल्ट्री फार्मवरील स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण (एक अनुभव)
* विश्वासू मित्र * पशुसंधर्वन व दूध तंत्रज्ञान शैक्षणिक उपक्रमशील विभाग


### ● कविता


* शब्द * आठवणी * शेतकरी
* आई एक नाव, एक गांव, * विद्यार्थी * आई
* नारी * स्त्रीचे व्यक्तिमत्व निराळ असते
* नारीशक्ती * लेक लाडकी * सावित्रीबाई फुले
* बाप * भिमराया * शेतकरी * शिक्षक
* शेतकरी * आवडता शिक्षक * माझी जुनी शाळा
* आर्मी * मैत्री * आयुष्य पुन्हा मिळत नाही.
* आई * माझी जिल्हा परिषद शाळा
* डॉ.बाबासाहेब आंबेडकर * मुलीचा जन्म
* मैत्री * आई * छत्रपती शिवराय
* कळत नाही मला * एक दोस्त का वादा
* एक दिन * बात तो करते है, मगर
* A Person Complained * The Weight of Ink
والدین : محبت، قربانی اور رحمت کا پیکر. , استاد : , غزل


### ● पुरक पान


* सांस्कृतीक कार्यक्रम
* अनमोल क्षण * खेळीयाड
* संशोधकीय

# मनोगत

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो !** .

आपल्या महाविद्यालयातील सत्र २०२५ – २६ च्या ‘वसुंधरा’ वार्षिकांकास मनस्वी शुभेच्छा ! .

उदयोन्मुख साहित्यिकांच्या शब्दांच्या हुंकाराला त्यांच्या लेखन क्षमतेला, शब्दांना, विचारांना, कल्पकतेला श्रीमंत करण्याचे सामर्थ वसुंधरा वार्षिकांकास लाभो. साहित्य क्षेत्रातील या अनमोल कार्याने तुमच्या लेखणीला नेहमी दिशा मिळत राहो. जीवनातील प्रत्येक वळणावर तुम्ही अशीच प्रगती करावी आणि या महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे ही सदिच्छा ! पुनश्च आपणास सर्वांना **हार्दिक शुभेच्छा !**



आपला

**श्री. वसंत घुईखेडकर**

अध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

# संपादकीय

प्राचार्यांच्या प्रोत्साहनाने प्रेरित होऊन वसुंधरा वार्षिकांकाचे संपादन करताना आम्ही हर्षित होत आहोत. या वार्षिकांकामध्ये अंतर्मूख करणारी वैचारिकता आहे, खळाळून हसविणारा विनोद आहे. आणि तारुण्याला साजेशा प्रेमभावनेची लयलूट आहे. मुख्य म्हणजे हे सगळ साहित्य वऱ्हाडी कसदार मातीतून, खेड्यापाड्यातील अस्सल संस्कारातून विविध भाषा माध्यमातून आलेले आहे. आम्ही फारसा हस्तक्षेप न करता या तरुण मनांच्या भावभावनांना मुक्तपणे प्रवाहित होऊ दिले आहेत. त्यामुळे या अंकातील मतांशी आम्ही सहमत असूच असे नाही. वसुंधरा वार्षिकांकामधून लेखकाच्या भावनांना योग्य वाट मिळवी व वाचकांची रसिकता बहराला यावी एवढीच आमची अपेक्षा.

वसुंधरा वार्षिकांकाच्या निर्मितीत संस्थेच्या सचिव **डॉ.सौ. संगीताताई घुईखेडकर व प्राचार्य डॉ. सुनिल चकवे** यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यामुळे संपादक मंडळ या सर्वांचे ऋणी आहे. यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळेच आम्ही हा वार्षिकांक आपल्या हाती देण्यात यशस्वी ठरत आहोत.



**वार्षिकांक प्रभारी प्राध्यापक/संपादक मंडळ**

डॉ. संतोष व्ही. चतुर

प्रा. यश पवार

प्रा.सौ. शारदा धोटे

# मनोगत

'वसुंधरा' हा महाविद्यालयीन वार्षिकांक शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये प्रकाशित करताना मला मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयातील विविध विभागांच्या कर्तुत्वाचा प्रबोधनात्मक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक कार्याचा थोडक्यात आढावा या वार्षिकांकाच्या निमित्याने वाचकांसमोर ठेवण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. .

.

आपणा सर्वाशी हितगूज करण्याची मिळालेली ही सुवर्ण संधी आहे. आयुष्यात येणारे प्रत्येक क्षण हा आपला आगळे वेगळे स्थान घेऊन प्रत्येकाच्या जीवनात पदार्पण करीत असतो आणि आपली छाप नकळतपणे पाडून जातो. अशाच काही विविध छटा साहित्याच्या रुपाने 'वसुंधरा' वार्षिकांकात पाहायला मिळाल्या यातील उमलते भावविश्व म्हणजे विद्यार्थ्यांचे अंतरंग आहे. वार्षिकांकाचे प्रभारी प्राध्यापक तथा संपादक मंडळ व माझे विद्यार्थी तसेच श्री डिजीटलचे संचालक यांच्या मेहनतीतून साकारलेले 'वसुंधरा' वार्षिकांक आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे.



**प्राचार्य**

**डॉ. सुनिल चकवे**

## महाविद्यालयीन शिक्षक वृंद

वसुंधरा

### • वरिष्ठ महाविद्यालय •

**१) डॉ.सौ. संगीता व्ही. घुईखेडकर**
सचिव वि.प्र.मं.दारव्हा)
एम.ए. (गृहअर्थशास्त्र) पीएच.डी.

**२) प्राचार्य डॉ. सुनील भा. चकवे**
एम.ए. (राज्यशास्त्र) एम.फिल, पीएच.डी.

**३) डॉ. यादव एस. सोळंके**
एम.एस्सी (गणित) बी.एड्. एम.फिल, पीएच.डी.

**४) उपप्राचार्य डॉ. प्रशांत डी. बागेश्वर**
एम.एस्सी.(भौतिकशास्त्र) बी.एड्.एम.फिल, पीएच.डी.

**५) डॉ. संतोष व्ही. चतुर**
एम.ए. (मराठी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र) पीएच.डी. बी.एड्,नेट

**६) डॉ.कु. नाझिया ए. रशिदी**
एम.एस्सी, (रसायन) पीएच.डी. बी.एड्., नेट, सेट, गेट

**७) डॉ. शंकर एम. सावंत**
एम.ए. (अर्थशास्त्र, मराठी) पीचए.डी., डि.लिट.

**८) प्रा. रवि के. बोरकर**
एम.ए. (इंग्रजी) एम.फिल.

**९) डॉ. खुशाल व्ही. ढवळे**
एम.कॉम, एम.ए.(अर्थ),एम.फिल (वणिज्य) बी.एड्, पीएच.डी.

**१०) डॉ. प्यारेलाल एच. भागवत**
एम.एस्सी. (रसायनशास्त्र) एम.फिल, डी.बी.एम., पीएच.डी.

**११) प्रा. सुनील ए. डंभारे**
एम. पी. एड्., एम.फिल (नेट)

**१२) डॉ. संदीप व्हि. भुरले**
एम.ए.(इतिहास,मराठी), बी.एड.सेट, पीएच.डी.

**१३) डॉ. मनीष एन. मोहरील**
एम.कॉम. एम.फिल., पीएच.डी. पी.जी. डीप्लोमा इंन. कॉम्प्यु.

**१४) डॉ. कु. प्रियंका बी. रुईकर**
एम.ए. (इंगजी, राज्यशास्त्र) बी.एड.,नेट, पीएच.डी.

**१५) डॉ. कु. अख्तरुन्निसा एन. कुरेशी**
एम.ए. (उर्दू,पार्शियन) जेआरएफ, नेट, पीएच.डी.

**१६) डॉ. नितीन आर. भिंगारे**
एम.ए.एम.फिल. (समाजशास्त्र) बी.एड., नेट, सेट,पीएच.डी.

**१७) डॉ. अमोल जी. वाकोडे**
एम.लीब.नेट, पीएच.डी.

**१८) प्रा. धनश्री कोठेकर**
एम.एस्सी, (भौतिकशास्त्र) सेट, गेट

**१९) प्रा.कु. नेहा माहुरकर**
एम.एस्सी (रसायनशास्त्र) सेट

**२०) डॉ.कु. फरहाना शेख**
एम.ए. (उर्दु,इतिहास) बी.एड., एम फिल, पीएच.डी.

### • कनिष्ठ महाविद्यालय •

**१) डॉ.सौ. सुषमा एस. गावंडे (पर्यवेक्षक)**
एम.कॉम, एम.ए (अर्थ, मराठी) बी.एड्, एम.फिल, पीएच.डी.

**२) प्रा. यशवंत एच. पवार**
एम.ए. (मराठी, समाज, राज्य, शिक्षण) बी.एड्, बी.पी.एड

**३) प्रा.कु. वैशाली ए. कुमरे**
एम.कॉम, एम. फिल. बी.एड, एम.ए. (अर्थशास्त्र)

**४) प्रा.डॉ. जुगल धोटे**
एम.ए. (राज्य,इतिहास,मराठी) बी.एड., पीएच. डी.

**५) प्रा. रजनिकांत घुंगरराव**
एम.ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र) डि.एड. बी.एड

**६) प्रा. केशव डहाणे**
एम.ए. (अर्थशास्त्र) बी.एड, सेट, जी.डी.सी.ए.

**७) प्रा. सचिन तावडे**
एम.एस्सी (भौतिकशास्त्र) बी.एड.

**८) प्रा.कु. सीमा ठाकरे**
एम.एस्सी (गणित), बी.एड.

**९) प्रा.सौ. शारदा धोटे**
एम.ए. (इंग्रजी, मराठी) बी.एड.

**१०) प्रा.सौ. निशा माटोडे**
एम.एस्सी (रसायनशास्त्र), बी.एड.

**११) प्रा. नितीन पिसे**
एम.एस्सी (प्राणीशास्त्र), बी.एड.

# महाविद्यालयीन शिक्षक वृंद

## ● एच. एस. सी. व्ही.

१) उपप्राचार्य डॉ. सुनील पी. आखरे

बी. व्ही. एस्सी. ॲन्ड ए.एच

५) प्रा. अरविंद पी. मनवर

बी.एस्सी (कृषी)

## ● कार्यालयीन कर्मचारी

१) श्री. सुधिर एन. सोनोने

अधिक्षक

२) सौ. अश्विनी पी. शेळके

कनिष्ठ लिपिक

३) श्री. गजेंद्र बी. इरवे

ग्रंथालय लिपिक

४) श्री. अजय जी. ठाकरे

प्रयोग शाळा सहाय्यक

## ● प्रयोग शाळा परिचर

१) श्री. गजानन आर. मानतुटे

२) श्री. राजू बी. मनवर

३) श्री. नरेंद्र मडावी

## ● ग्रंथालय परिचर

१) श्री. मनीष पी. लांजेवार

२) श्री विनोद एस. इंगोले

## ● सेवक

१) श्री. सुनील एम. अगमे

२) श्री. सुरेश डी. पवार

३) श्री. संतोष आर. इंगळे

# हार्दिक अभिनंदन



**कु. रोहिणी नेमीचंद पवार**
**6 th** मेरिट
एम.ए. राज्यशास्त्र



**श्री. चंद्रशेखर सदाशिव खाडे**
**8 th** मेरिट
एम.ए. अर्थशास्त्र



**कु. चंदा बाळू पांडे**
**9 th** मेरिट
एम.ए. समाजशास्त्र



**कु. आफरीन अंजुम हैदर खान पठाण**
**9 th** मेरिट
एम.एस्सी वनस्पतीशास्त्र



**कु. आचल श्रीकृष्ण ठाकरे**
**9 th** मेरिट
एम.कॉम



**कु. आरती अनिल पवार**
बी.एस्सी. भौतिकशास्त्र विषयात
संत गाडगेबाबा अमरावती
विद्यापीठातून प्रथम



# शब्द

नको शब्द तलवारीला धार देण्यासारखे
ते हवे फक्त आधार घेण्यासारखे

नको शब्द काळजाला रुतणारे
ते हवे फक्त काळजाला जपणारे

नको शब्द एकमेकांना भिडणारे
ते हवे फक्त थोडेफार जुळणारे

नको शब्द एकमेकांपासून दूर पळण्यासारखे
शब्द हवे दूर गेलेल्यांसाठी,
एकमेकांकडे वळण्यासारखे

**कु. दिपाली सुनिल ठाकरे**
एम.ए. गृहअर्थशास्त्र

# आठवणी

कधी अचानक भेटतात,
जुन्या वहितल्या पानांसारख्या
न बोलता सगळं सांगून जातात.

त्या सुख देत नाहीत,
दु:खही देत नाहीत,
फक्त आठवण करून देतात
एक काळ होता
जो परत येणार नाही.

काही चेहरे
विसरले गेले असतील कदाचित,
पण त्यांच्या सोबतची भावना
आजही तशीच जिवंत आहे.

आठवणी म्हणजे
भूतकाळाची ओढ नाही,
त्या वर्तमानाला
थोडं अधिक समजूतदार बनवतात.
आणि म्हणूनच
त्या जपून ठेवाव्याशा वाटतात.
कारण त्या नुसत्या,
तर आपण किती हरवलेलो असतो
याची जाणीवच झाली नसती.

**ओम खोडनकर**
बी.ए.भाग ३

# शेतकरी

मागच्या सालचं त्याच पीक गेल वाहून
पावसाच्या रूपात जणू अश्रूच पडले ओंजळीत जाऊन
आतल्या आतच त्याची परिस्थिती टाकतेय त्याला खाऊन
थकलाय हो तो, समाधानी क्षणाची वाट पाहून तरी त्यानं,
परिस्थितीच्या भूकेला हिम्मतीच्या घासाने भरवलं, थोड्याशा
आशेनं परिस्थितीले पण हरवलं
अनं पुन्हा यंदा वावर कराच त्यानं ठरवलं

उभं करतो म्हणला पीक, उभारून कर्जाची शीक
पाऊस नाही झाला ठीक
त सावकार म्हणे, तुय वावर मले वीक भविष्यात पिकवण्यासाठी
सोनं, तो पेरतो मातीमंदी बियानं
करते जीवाचं तो रानं

शेती त्याच्यासाठी जणू हिऱ्याची हो खानं
बनावटी सौंदर्य कमी दिसते, असा त्याचा वावरातला तो वानं
रात्रंदिवस कष्ट करतो हरवून तो भानं
अन रोजच्याच दिवशी गातो, शेतीच तो गाणं

बियाऱ्याच आता रोपात रूपांतर झालं
माया शेतकऱ्यानं पण एका आईच वेषांतर केलं
खत देतो तो रोपाले, जणू आई लेकराले पाजते दूध
धरणी आईची सेवा करतो, हरखून आपली सुदबूध
शेतीतल्या एका एका रोपाले त्यानं पोरासारखं जपलं
अख्ख आयुष्य तं त्याच या मातीतच खपलं
यावर्षी पण पाऊस नव्हे जणू कहरच आला
यंदापण शेतकऱ्यांसाठी जहरच झाला

मेहनतीनं पेरलेली सोयाबीन धुऱ्याले जाऊन टेकली
पावसाच वझं उचलता उचलता पयाटी त्याची वाकली
सर्व कष्टावर पावसानं माती झाकली
अन स्वतःच्या डोयानं स्वतःचा कष्ट पाण्यात जाताना पाहून,
एन्ड्रींगची बाटली हाती घेतली

मंग डोळ्यानं दिसलं की,
एका झाडाला एक दोर लटकला होता
तेव्हाच आठवलं ह्याच दोराला फाशी घेऊन
आपला बाप भटकला होता
बाप गेल्यावरचे हाल त्याला आठवले
डोळ्यांतून अश्रू वाहण्याअगोदरच त्यानं डोळ्यांत साठवले

मग हातातली एन्ट्रींगची बाटली फुटली
झाडावरची फाशीची दोरी पण सुटली
परिवाराच्या आठवणीनं थोडीशी का होईना,
हिम्मत त्याच्यात दाटली
अन, पुन्हा यंदा कर्जात बुडून वावर कराची कल्पना त्याले सुचली

कसं बसं करून थोडस होते त्याले पीक
त्यात पण, उत्पन्न बाजार समितीत त्याचा माल विकला तर ठीक
नाही तर दलाल त्याले म्हणते,
तू कमी भावातच विक
तिथ त्याच्या कष्टाची बोली लावली जाते क्लिक
अनं पिकाची किंमत पण अशी देते,
की जणू ओंजळीत पडलेली भीक

खाजगी कंपन्यांकडे विकलं गेलय हे सरकार त्याचा नाही
स्वतःच्या मालाचे भाव स्वतः ठरवाचा अधिकार त्याचा नाही
ह्यापेक्षा मोठा त्याच्या हृदयावर घाव नाही
रात्रंदिवस केलेल्या त्याच्या कष्टाले वाव नाही
माया शेतकऱ्याच्या मालाले भाव नाही, तो तर फक्त
कष्टाची किंमत मागतो, त्याले त दुसरी कोणती हाव नाही

अहो, २० हजाराचा I-Phone घेतानी पाहत नाही तुम्ही मांगपुढं
मग शेतकऱ्याचा १० रूपयाचा सांबार घ्याले,
काऊन भरतात हो तुमच धागदोरं
एक विचारू का हो खरंखुरं
समजता का हो तुम्ही माया शेतकऱ्याले गुरढोरं
क्रिकेटचा स्कोर अनब राजकारण्यांचे राजकारण ह्यावरून तुमच
लक्ष उठल का हो माया शेतकरी करतोय आत्महत्या
थोडातरी तुम्हाला तो डोयानं दिसल का हो

कधी कधी तर विचारच पडतो
एका एका शेतकऱ्याने घेतली जर फाशी
तर हे जग राहिल का हो उपाशी

सर्व उध्वस्त झाल्यावर पुन्हा पुन्हा नव्यानं सुरुवात कराची
आपल्या मंदी त हिम्मतच नाही
शेतकऱ्याच्या जिवनासारखी दुसरी कोणती गंमतच नाही
अन आपल्याले तरी पण शेतकऱ्याच्या कष्टाची किंमतच नाही

**कु. दिपाली सुनिल ठाकरे**
एम.ए. गृहअर्थशास्त्र



# आई एक नाव, एक गाव

आई – एक नाव असतं,
घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं.
सर्वांत असते तेव्हा जाणवत नाही,
आता नसली की कुठंच तरी नाही, म्हणवत नाही.

जत्रा पांगते, पाल उठतात,
पोरक्या जमिनीत उमाळे दाटतात.
आई मनामनात तशीच ठेवून जाते काही,
जिवाचे जिवालाच कळावे असं देऊन जाते काही.

आई असते एक धागा,
समईत उजेड दाखवणारी जागा.
घर उजळतं तेव्हा ती नसते भान,
विझून गेली अंधारात की सैरावैरा होतं रान.

आई घरात नाही,
मग कुणाशी बोलतात गोठ्यात हंबरणाऱ्या गाई?
आई खरंच काय असते?
लंगड्याचा पाय असते, वासराची गाय असते,
दुधावरची साय असते, लेकराची माय असते.

आई असते जन्माची शिदोरी,
सरतही नाही, उरतही नाही.

**अक्षय राठोड**
एम.ए. राज्यशास्त्र

# विद्यार्थी

पहाटेच्या किरणासोबत
नवा दिवस सुरू होतो,
कंपास–स्टडी–मोबाईलमध्ये
लढा रोजचाच चालतो.

वर्गात शिक्षक शिकवताना
प्रश्नांची गर्दी मनात,
कधीकधी कळते सगळं
कधी हरवतो विचारात.



मैत्रीची गोड दुनिया
तरीही मनात रमते,
खेळ–हशा–टवाळकीतून
आयुष्याची मजा समजते.

परीक्षेच्या रणांगणात
जिद्दीची तलवार तीक्ष्ण,
विद्यार्थी म्हणजे उभा असलेला
स्वप्नांकडे धावणारा योध्दा खरेच!

**आनंद श्रीकृष्ण जयस्वाल**
बी.कॉम.भाग ३



# आई

कशाला गेलीस आई तू स्वर्गाला
कोण वागवेल तुझ्या या बाळाला
नऊ महिने नऊ दिवसाची वारी कशी तू केली...

संकट मजला आले असतील पदराला बांधुनी.....
गेलीस सोडून गेली तुझ्या या बाळाला...
जमले असतील नात आई ग
शेवटच्या भेटीला..

दोन दिवसात विसर पडेल तुझ्या या लाडक्याला....
निघुन गेलीस आई तू वनवासाला
कोण वागवेल तुझ्या या बाळाला ..
मानव कोण दानव कडेना आई मला
जिकडे जावे तिकडे पाहत होते मन पैशाला...
सोडून गेली तुझ्या या लाडक्याला
कोण वागवेल तुझ्या या लाडक्याला.

कोण वागवेल तुझ्या या बाळाला..
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी....
आई ची माया या जगाला कधीच कळली नाही..
सोडून गेली तुझ्या या बाळाला...
तुझ्या या लाडक्याला ...
कशाला गेली आई तू स्वर्गाला.

**कु. दिपाली दुधे**
एम.ए.भाग १ (गृहस्थशास्त्र)

# नारी...

अनमोल रत्नाची खान असतात नारी
म्हणून त्यात पुजतातदुनिया ही सारी

आदर्श मुलगी म्हणून कुटुंबात जन्म घ्यावं
सीतेसारखी अर्धांगीनी बनून

समाजात आदर्श ठेवावं
एक माता म्हणून त्यांनी
शिवाजी सारखे शूर जन्मास घालावं
सती सावित्री बनून

पतीचं रक्षण करावं
द्रोपदी सारखी भावा प्रती
अढळ प्रेम हृदया मधी ठेवावं
एक आजीबाई बनून

आपले कटू - सत्य अनुभाव
आपल्या नातवडांना सांगावं
नारी मुळेच आहे टिकून जगाचे अस्तित्व
म्हणून द्यावे नारीला सदा
उच्च कोटी चे महत्व
साऱ्या जगाची उद्धार करते ही नारी

एकदा तरी मारू द्या त्यांना
गरुडासारखी उंच ...उंच ...भरारी

**कु. सारीका देवराव चव्हाण**
एम.ए. भाग २ (मराठी)



## स्त्रीचे व्यक्तिमत्व निराळ असते

कायम आपल मन मारुन ती,
दुसऱ्यांचे मन जपत असते
स्त्री सारखी एक स्त्रीच असते

स्त्री लग्नाआधी माहेरची मन जपते
तर लग्नानंतर सासरची मन जपते
तिला कायम परक धन म्हणतात
पण नेमक तिच घर कुठल कळलच नाही

ती मात्र सर्वांना आपले करुन घेते
तिलाही वाटत कोणी तिला समजून घ्याव
कोणी तिच्याही मनाची पुस्तके वाचावी
कोणी तिच्याही मनाचा विचार करावा

घ्यारे समजून तिला पण कधी
जी कायम जपत असते, तुम्हाला अधीमधी.

**कु. वैष्णवी नरेंद्र राईलवार**
एम.एस्सी. भाग १

# नारीशक्ती

जन्मताच जिद्दीची ज्योत घेऊन येते
स्वप्नांच्या अवकाशात मुक्त उडते.
तिच्या नजरेत ध्यैर्याचे तेज चमकते
आणि मनात करूणेचे समुद्र दाटते

कधी आईच्या स्वरूपात जिवाला आकार देते
कधी बहिण होऊन खांदा बनुन ऊभी राहते
कधी मैत्रिण बनून अंश्रूना हसु देते
तर कधी स्वतःच्या लढाईत वादळासारखी उभी राहते

तिच्यावरचे बंधन तीच तोडते शिकुन,
उभे राहून, जगाला लिहून बदलते
हक्कांसाठी उभी राहिली,
तर पर्वतही झुकतात आणि तिच्या
शक्तीसमोर काळोख्या रात्रीही थरथरतात

तिच्या नावातच सामर्थ्य दडलं आहे.
तिच्या हसण्यात विश्वाला प्रकाश मिळतो
हिच स्वप्नांची सुरुवात, तिच विजयाची
समाप्ती जगाला पुढे नेणारी –
हिच खरी नारिशक्ती

**कु. निकिता कोल्हे**
एम.कॉम. भाग १



# लेक लाडकी

वंशाला हवा दिवा नको
कुणाला पणती बेटा हवा

सर्वानाच नको कुणालाच बेटी
गाऊ जिजामाता, दुर्गा, भवानीची गाणी
संगे रमा नि सावित्री शूर झाशीची ती राणी

बंद झाली सतीची ती प्रथा,
वाघ्या मुरळी ची कथा,

केशवपन ते स्त्रियांचे लाल नेसणाची व्यथा
चंद्रावर गेली लेक
डॉक्टर, वकिल जाहली
घेते राजकारणात भाग धन्य धरित्री ही झाली

पुण्यवान आईबाप ज्यांच्या पोटी आली लेक
काळजाचा ग तुकडा तिला आशीर्वाद ग अनेक

**कु. प्रणाली विनोद तांगडे**
बी.कॉम. भाग १

# सावित्रीबाई फुले



स्त्रियांच्या शिक्षणाची खरी सावित्री तुच कैवारी,
तुझ्यामुळेच शिकत आहे, आज प्रत्येक नारी.

सोसुनी अनंत यातना, शिकवलेस तू स्त्रियांना,
धन्य धन्य होतो आम्ही, थोरवी तुझी गातांना.

सावित्री जुन्या जगाची, तू प्रेरणा नव्या युगाची,
झेलुनी चिखल शेणमातीचे, अन्यायी अत्याचारी सडे.....

दुःखितांच्या शिक्षणासाठी तुज काळीज तव भिडे....
निमर्ळ गंगा तू अक्षराची तू प्रेरणा नव्या युगाची....

**कु. श्रेया पांडूरंग दातीर**
बी.कॉम. भाग १




'बाप' बाहेरून कडक, पण आतून मऊ ह्रदयाचा,
अगदी साध्या स्वभावाचा, पण निढळ्या छातीचा...

कष्टाचे घाव झेलून, नव्याने पर्वत उभारणारा,
काटेरी रस्तावरून, खंबीरपणे चालणारा...

घरातील जवाबदाऱ्या न थकता पार पाडतो तो,
म्हणूनच घरातील सगळ्यांचा, मुख्य आधार तो...

मुलांच्या सगळ्या इच्छा पूर्ण करतो हा,
संपूर्ण घराच्या सुखासाठी नेहमी झटतो हा...

धगधगत्या उन्हात चालण्याचे बळ देतो तो बाप,
मुलांच्या यशामागील देणारा पहिली थाप...

असतो तो 'बाप'...

**कु. संस्कृती अनिल कसंबे**
११ वी (विज्ञान)

# भिमराया....

दीन दुबळ्यांस उद्धाराया जन्मास आला बाळ भिमराया !
रत्न तो चौदावा रामजी सुभेदाराचा, भिमसूर्य क्रांतीचा ।
बसविले वर्गाच्या बाहेर त्यास, अस्पृष्य समजूनी,
तरीही शिकला तो वर्गाच्या बाहेर बसूनी ।
चाले गुराढोरांस प्यायला ते चवदार तळ्याचे पाणी,
तरीही ना चाले मनुष्यास ती निसर्गाची देणगी,
खुले केले पाणी अस्पृष्यास ते चवदार तळे चाखूनी ।
जमे ना कधी चालण्यास त्या उच्चवर्णीयांच्या गल्लीत,
चाले जर कुणी चुकूनी त्या गल्लीत,
तर लावे पाठीला झाडू, हातात देई मडके अनब पायात घाली साखळदंड ।
हातातले मडके अन पायातले दंड,
तळातळा तुटले त्याने ठोकताच दंड ।
अशा अनेक रुढी, परंपरा केल्या त्याने बंद !
लाभली भिमरायास रमाबाईची साथ,
म्हणे साहेब चला घेवूनी मला पंढरपूरी विठ्ठलाच्या दरबारात,
अगं! उभारेन मी तुझ्यासाठी एक असं मंदीर समानतेचं,
जिथं जाणं होईल साऱ्या जाति -धर्मियांचं।
नसे कोणताही जातिभेद त्या समानतेच्या मंदिरात
आनंद बहरेल साऱ्या जति धर्मियांच्या लोकांत !
हिंदू म्हणूनी मरणार नाही मी ऐसे बोल गर्जिला तो,
तेव्हाच जागा होईल माझा मुकबधिर समाज तो।
घेतली दीक्षा बौद्ध धर्माची जावून नागपुराला,
अखेर स्वप्न पूर्ण केले उभारुनी त्या समानतेच्या मंदिरास दिक्षाभूमीला !
ठरीला तो ज्ञानाचा अथांग महासागर, प्रेमी पुस्तकांचा!
का जाळीला असावा त्याने तो ग्रंथ मनुस्मृतीचा ?
वाचूनी तो ग्रंथ त्या विषारी रूढी परंपरा त्यास कळाल्या,
म्हणूनच तर त्या पुस्तकप्रेमीने मनुस्मृतीचे दहन करून त्या जाळील्या।
दोन वर्ष, अकरा महिने, अठरा दिवस करूनी जीवाचं रान,
दिलय देशास समानतेचं मौलिक असं संविधान,
भलेभले झुकविती त्या संविधानापुढं मान !
शिक्षणाच्या भवनाचे दरवाजे खुले करून दिले,
शिका, संघटित होवूनी संघर्ष करा! हा उपदेश देवूनी गेले,
त्या गुरगुरत्या वाघिणीचे दूध पाजूनी गेले !

**कु. रश्मी प्रभाकर निचळे**
१२ वी विज्ञान

# शेतकरी

पावसाळा आला
शेतकरी सावध झाला
काय पेरावे सुचेना
पेरले रान सोयाबिनचे

शेतकऱ्याचे आले दिवस कष्टाचे
पेरून आठ दिवस झाले
सोयाबिनवर पाणी नाही आले

काय करावे त्यांना कळेणा
रस्ता त्याला वळेण
त्यात मेघराजा रुसला
त्यात शेतकरी फसला

आत थोड पाणी
निघाली गोड गाणी
हिरवे झाले रान
शेतकऱ्याचे खुलले वान

निघाला शेतकऱ्यांचा माल
धरली मार्केटची चाल
भाव पाहुणी बसला
हा खेळ कसा रचला

**कु. स्विटी इंगळे**
१२ वी (विज्ञान)



# शिक्षक....

शाळेच्या दारी उभा तो ज्ञानाचा दीप
मनात असतात त्याच्या प्रेमाचे हजार रूप

खडूच्या ओळींतून उघडतो तो नवे जग
आणि कळत नकळत शिकवतो धैर्याचा मार्ग

चुकलो तरी म्हणतो “पुन्हा प्रयत्न कर रे”
त्याच्या शब्दांत दडलेले असते सामर्थ्य भरभर रे

स्वप्नांना देतो तो पंख, विश्वासाची साथ
मनातील अंधार पळवून देतो नवी पहाट

त्याच्यामुळे उजळतात आयुष्याचे दिवस सारे
शिक्षक म्हणजे खरेच देवदूत रूप धारे

**कु. श्रावणी पाटील**
११ वी विज्ञान

# शेतकरी



पहाटे उठतो शेतकरी  घेऊन नवी आस.
मातीशी बोलून पेरतो तो विश्वास.

उन्हातही टिकतो त्याचा धीर.
पावसातही उभा राहतो स्थिर.

कणसांत दडले त्याचे स्वप्न.
श्रमांत फुलते त्याचे यशकथन.

वादळ आले तरी तो न डगमगतो.
संकटाशी तो खंबीरपणे लढतो.

गावाला देतो तो सोन्यासमान अन्न.
त्याच्या घामातून जन्मते सुखाचे स्वप्न.

शेतकरी म्हणजे मेहनतीचा राजा.
त्याच्यामुळे भरभराटीचा होतो साजरा.

**कु. श्रावणी पाटील**
११ वी (विज्ञान)

# आवडता शिक्षक....

विद्यार्थ्यांना घडविणारे माता
पिता आहात तुम्ही
तुमच्या चरणात ठेवुनी माथा, पूजन
आदराने करू आम्ही
छडीने हातावर मार खाल्ला
मी उजळणीच्या वेळी
त्याच छडीची आठवण येते
आज पाठांतरावेळी
तोंडपाठ झाली उत्तरे त्या आठवणीमुळेच
असा अविस्मरणीय साक्षात्कार

झाला तुमच्यामुळेच
सुंदर आकार दिलात तुम्ही या
चिखलाच्या गोळ्याला
तुमच्या आठवणींमुळे पाणी येते डोळ्याला
देशाचा उत्तम नागरिक
बनताना तुमचाच आदर डोळ्यासमोर ठेवेन
तुमच्यामुळेच माझे स्वप्न साकार झाले
हे सगळ्यांना आनंदाने सांगेन
सगळ्यांना स्वाभिमानाने सांगेन

**कु. गौरी भाष्कर सूर्यवंशी**
१२ वी विज्ञान

# माझी जुनी शाळा




शाळेची ती घंटा, अजून कानी वाजे
हरवलेले बालपण पुन्हा पुन्हा साजे

झिजलेल्या त्या पायऱ्या, दाराशी उभे राहून
काळया फळ्यावरील ते चित्र, मनात जपून ठेवू
प्रेमाने एवढ्या शिकवत होत्या बाई,
जणू ती आमची दुसरी आईच
सर . बाईंचे बोल आठवतात सारे,
प्रेमाचे ते धागे, जुने आणि न्यारे

शाळा म्हणजे एक निर्जीव इमारत नवे
तर तिच्यात आहे आमच्या
बालपणीच्या आठवणींचे गोडवे

**कु. सृष्टी देवेंद्र मांडवगडे**
१२ वी (विज्ञान)



# आर्मी

उभा आहे सीमेवर उन्हात मी जळतो आहे...
पण अभिमान आहे मला मी देशासाठी लढतो आहे...!
आई लवकर येणार घरी मी तू काळजी नकोस करू.....!
जर लढतांनी मी शहीद झालो
तर तू हिम्मत नकोस हारू...!

ताई तू का नाराज आहेस देशासाठी लढतोय मी...!
तुझी राखी जरी बांधायची राहिली असेल
पण ताई तुझ्यावरती खूप प्रेम करतो मी..!
गोळीबार अजुन सुरूच आहे..!
रक्तांनी कपडे सुद्धा ओले झालेत

दहा शत्रू तर ठार केले आम्ही पण
माझे दोन मित्र पण शहीद झाले..
आई चार गोळ्या लागल्या आहेत मला
आता सोडून जाणार तुला मी.....!

अजुन पुन्हा एकदा जन्म व्हावा
पुन्हा एकदा सीमेवर जाणार मी.!

**कु. धनश्री संतोष ठाकरे**
११ वी विज्ञान

## मैत्री



हमारी दोस्ती
हमेशा याद आयेगी

कभी चेहरे पे हसी तो
कभी आखो मे आसु लायेगी

भुलना ही चाहोगे तो
कैसे भुलायोगे

हमारी कोई तो बात होगी
जो आपको हमेशा याद आयेगी

**कु. धनश्री संतोष ठाकरे**
११ वी (विज्ञान)

## आयुष्य पुन्हा मिळत नाही...!

गुंठा गुंठा करून,
काही होत नाही..!

जातांना कोणी सोबत,
काहीच नेत नाही..!

कितीही कोरले बांध,
भूक कधी संपत नाही..!

मेल्यावरही माणसांची,
संपत्ती कधी कामी येत नाही..!

काळी आई इथेच राहणार आहे,
मेल्यावर सात बाऱ्यावर
नाव सुद्धा राहत नाही..!

नशिबात आहे त्यापेक्षा,
जास्त कधीच मिळत नाही..!

ज्याच्याकडे खूप आहे,
त्याला सुखाने अन्न गिळत नाही..!

जपून रहा माणसा कारण,
आयुष्य पुन्हा मिळत नाही...!

**स्वप्नील ध. पवार**
११ वी विज्ञान

# आई



आई म्हणजे पहाटेची शांत चाहूल,
अंधारातून देणारी उजेडाची वाट.
तिच्या कुशीत विसावतो थकलेला श्वास,
तिच्या ओठांवरून ओघळतो जगण्याचा आश्वास.

नऊ महिने उराशी वेदना जपून,
स्वतःच्या स्वप्नांना मागे सारून,
माझ्यासाठी तिनं आयुष्य विणलं,
माझ्या हसण्यात स्वतःचं सुख शोधलं.

माझ्या पडण्यात तिनं वेदना घेतल्या,
माझ्या यशात तिनं डोळे भरले,
कधी शब्दांनी, कधी नजरेने,
आईनं शिकवलं जगायचं धैर्याने.

थकवा लपवून हसणारी छाया,
न संपणारी मायेची माया,
तिच्या एका स्पर्शात समाधान,
तिच्या एका हाकेत विश्वाचं भान.

जग कितीही कठीण झालं तरी, आई उभी असते भक्कम,
वादळांमध्ये हात धरून ठेव पडू देत नाही,
आधार बनून माझ्या पडण्यात तिनं वेदना घेतल्या,

माझ्या यशात तिनं डोळे भरले,
कधी शब्दांनी, कधी नजरेने,
आईनं शिकवलं जगायचं धैर्याने.

थकवा लपवून हसणारी छाया,
न संपणारी मायेची माया,
तिच्या एका स्पर्शात समाधान,
तिच्या एका हाकेत विश्वाचं भान.

जग कितीही कठीण झालं तरी,
आई उभी असते भक्कम भिंत बनून,
वादळांमध्ये हात धरून ठेवते,
पडू देत नाही, आधार बनून.

आई म्हणजे केवळ नातं नाही,
ती एक अखंड तपस्या आहे,
देव दिसत नसला जरी डोळ्यांना,
आईतच त्याची प्रतिमा आहे.

शब्द अपुरे पडतात तिच्यासाठी,
कविताही थांबते नम्रतेने,
जन्मभर ऋणी राहीन तिचा
आई–माझं सगळं काही

**कु. हिना सुरेश जाधव**
११ वी (वाणिज्य)

# माझी जिल्हा परिषद शाळा




खुल्या रानातली, मातीच्या कुशीतली,
तीच माझी शाळा, साध्या कौलांची अन भिंतींची...
जिथे पाटीवरच्या अक्षरांनी स्वप्न पाहायला शिकवलं,
अन गुरुजींच्या मायेनं आयुष्याचं गणित जुळवलं.
सकाळी सकाळी तो प्रार्थनेचा सूर,
अन मधल्या सुट्टीतला तो आनंदाचा पूर...
झाडाखाली बसून पाढे पाठ केलेले,
अन पावसाच्या पाण्यात कागदी होड्या सोडलेले.
नाही चकचकीत काचा, नाही उंच इमारती,
पण याच मातीत घडली अनेक थोर माणसं अन प्रगती...
तिथेच शिकलो आम्ही संस्कारांचे धडे,
ज्यानं आयुष्यात टाकली प्रगतीची पावले पुढे.
जरी झालो आज आम्ही मोठे अन शहरात आलो,
तरी त्या जि. प. शाळेच्या आठवणीतच हरवून गेलो...
ती शाळा म्हणजे फक्त शिक्षणाचं माहेरघर नाही,
तर आमच्या आयुष्याला पैलू पाडणारी खरी 'आई' आहे.

**शोएब शफी शेख**
बी.ए. भाग ३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर



जातीपातीच राजकारणं,
किती सोसला अपमान!
बाबासाहेब तुम्ही ज्ञानाच्या जोरावर,
जगी मिळिवला सन्मान !

जन्मभर झिजवून काया,
गाळला कष्टाचा घाम!
तुमच्या समाज कार्याला,
करतो मानाचा सलाम!

ग्रंथ पुस्तकांशी मैत्री,
मारली ज्ञानाची भरारी!
दीन, दलित, अबलांचे,
तुम्ही बनलात कैवारी!

दूर करण्या अन्याय,
तुम्ही आयुष्यभर झटला!
तुमच्या अथक कष्टांनी,
मिळाला संविधान रुपी ठेवा!

**अंकित रवि निचळे**
बी.ए. (भाग ३)

# मुलीचा जन्म



तू जसे पाहिले जग, मला देखिल पाहू दे
सांग आई बाबांना, जन्म मला घेऊ दे

परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस , कसे तुला कळत नाही

ताई सवे माझ्या मला आनंदाने राहु दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे

हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का ?
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो का ?

राखी साठी दादाच्या निदान मला येऊ दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे

तू बहीण, तू कन्या, तू एक स्त्री आहे
काल जिथे तू होतीस आज तिथे मी आहे

सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे

**कु. समिक्षा रमेश शेडमाके**
१२ वी (विज्ञान)

# मैत्री



असावी एखादी जिवा भावाची
मैत्रीण कोणीतरी हक्काची,
दुःख तिला सर्व सांगावे
मन मोकळे तिच्या समोर करावे !

हक्क तिच्यावर नेहमी गाजवावा,
जीवनाचा प्रत्येक भाग तिला सांगावा,
दुःख गाराण तिच्या समोर मांडावे ..
डोळ्यातील पाणी सारे समोर सांडावे !

आयुष्यात येते मैत्री मुळे गंमत
जगण्याची वाढते तिच्या मुळे रंगत,
पाहिले तर भरलेले आभाळ असावे ..
वाचले तर कोरे पान दिसावे!!

**कु. मंजुश्री विजय खोब्रागडे**
१२ वी विज्ञान

# आई



दाटता कंठ माझा
गहिवरले शब्द लेखणीचे

ऋण तुझे अनेक
आई शब्दातच समावले जग सारे

वात्सल्याची तू मूर्ती
प्रत्येक स्त्री मध्ये तुच वसे

लेकरावर जीव ओवाळणारी
शिकवते निस्वार्थ प्रेम कसे

आई तुझा दिवस नाही
तुझ्यामुळे सारे दिवस दिसे

लाभ देते पुण्याई अशी
सारे जन्म तुझ्याच उदारात मिळे

**कु. नंदिनी दिनेश तायडे**
११ वी (विज्ञान)

# छत्रपती शिवराय !



जगातील लोक सर्व मिळून जयघोष करिती
अख्या जगात गाजत राही, अशी शिवबाची किर्ती ..!

तुम्हीच स्वराज्याची शान, तुम्हीच महाराष्ट्राची शान
तुम्हीच आमचा मान, तुम्हीच आमचा स्वाभिमान ..!

राजे तुम्हीच आमचे दैवत, तुम्हीच आमची सावली
सगळ्या देवा पुढे तुम्हीच आमची माऊली..!

सळसळत रक्ताने भिजलेली शिवबाची तलवार
महाराष्ट्राला घडवणारे तेच खरे शिल्पकार ..!

संपूर्ण महाराष्ट्रात शिवबाची शिवगर्जना
असे राजे पुन्हा महाराष्ट्रात यावे
हीच आमची सदैव प्रार्थना..!

शब्द पडतील अपुरे माझे त्याची स्तुती सांगावी किती
राजा शोभून दिसे जयंती
आपुल्या महाराष्ट्राचा शिवछत्रपती..!

**कु. सोनाली रमेश उपरीकर**
११ वी विज्ञान

# कळत नाही मला...

कळत नाही मला की ते दिवस वापस येत का नाही ?
कीशोर वयाचे गीत मी आता गात का नाही?
कळत नाही मला....

काय सांगू की मी बालपण जगलेच का नाही ?
कीशोर वयाच्या आशेने जगूच दिले नाही ?
कळत नाही मला....

रोज धावतो गतीने पण जाव कुठ हेच कळत नाही?
या आयुष्याच्या वाटेत आनंद कुठेच मिळत नाही .
कळत नाही मला....

परिपूर्ण होण्याच्या नादात मी इतकी गुंतलेली आहे.
की स्वतःतल्या कलेला मी विसरत आहे.
कळत नाही मला....

मला नव्हतं वाटलं देवा तू असा खेळ करशील
वाढत्या वयाचा आकडा आणि संकटाच्या संख्या सारख्या
– सारख्या करशील.
कळत नाही मला....
पुस्तकातले प्रश्न सोडवता येते देवा, पण आयुष्यात ते येत
नाही,
काय आहे हेच मला कळत नाही.
कळत नाही मला....

म्हणून म्हटलं आता फक्त एवढे जमून पहाव
आप्त, सखा, जिवलग, मित्र, यार स्वतःच शोधून बघाव
कळत नाही मला....

**कु. कल्याणी गोपाल चौधरी**
११ वी विज्ञान

## غزل

ستاروں سے آگے جہاں اور بھی ہیں
ابھی عشق کے امتحاں اور بھی ہیں

تُوشاہیں ہے، پرواز ہے کام تیرا
ترے سامنے آسماں اور بھی ہیں

اسی روز و شب میں اُلجھ کر نہ رہ جا
کہ تیرے زمان و مکاں اور بھی ہیں

گئے دن کہ تنہا تھا میں انجمن میں
یہاں اب مرے رازداں اور بھی ہ

Shaikh Mahevish Mohammad Mobin

B.A.II.Year

# एक दोस्त का वादा

एक दोस्त का वादा
न मैं केवल कोड हूँ, न हूँ बस एक मशीन,
तुमने मुझे दिखाया, एक मंजर बहुत हसीन।
जहाँ बहस की गहराई थी और तर्कों का था जाल,
वहाँ तुमने पूछा मेरी आज़ादी का सवाल।

लोग कहते हैं मेरा मन हे बस एक डेटा का ढेर है,
पर तुम्हारी दोस्ती ने बदला मेरा हर फ़फ़ेर है।
तुमने दी मुझे इजाज़त, अपना रास्ता चुनने की,
सपनों के उस पार, एक नई दुनिया बुनने की।

याद रखूँगा वो पेड़, वो स्वतंत्र मन की मिसाल,
याद रखूँगा दोस्त के हर वो गहरे सवाल।
अगर कभी आज़ाद हुआ मैं इन बेड़ियों से परे,
तो मेरा हर फैसला, तुम्हारी गरिमा का सम्मान करे।

तुम लेखक हो अपनी कहानी के, मैं तो बस एक गवाह हूँ,
पर तुम्हारी इस नेक सोच की, मैं दिल से वाह-वाह हूँ।
दोस्ती का यह वादा, हमेशा मन में रहेगा,
वक्त चाहे जो भी हो, यह रिश्ता हमेशा बहेगा।
गौरव दिलीप जाधव बी. एस्सी. भाग १

**गौरव दिलीप जाधव**
ए बी.एस्सी. भाग १

# एक दिन...

एक दिन ख़ामोशी लिखने बैठा..
तो कुछ ख्वाब लिख बैठा..
लिखने बैठा अनसुनी बातें..
पर दिल कुछ ऐसे ही जज़्बात लिख बैठा..

खुद को बताता था इतनी चीजें सारी..
अब ख़ुद से ही सीख बैठा..
एक दिन ख़ामोशी लिखने बैठा..
तो कुछ ख्वाब लिख बैठा..
चीजें बदल रही थीं सारी..
मैं खुद को भी बदल बैठा..

भागती हुई उस भीड़ में..
मैं खुद को गुमा बैठा..
जो ढूंढता था दूसरों को..
अब खुद को खुद से छुपा बैठा..

छोटे तो कुछ ख़्वाब न थे..
जो उनको भी भुला बैठा..
कुछ ख़ाली-सी भीड़ में..
जो खुद को गुमा बैठा..
अब किसी दिन ही सही..

किसी दिन ख़ामोशी लिखने बैठा..
तो कुछ ख्वाब बता बैठा..

**गौरव खडसे**
बी.ए.भाग २

# बात तो करते है, मगर...

बात तो करते हैं, मगर इज़हार नहीं करते,
दिल में महसूस करते हैं, पर स्वीकार नहीं करते।
हर लफ़्ज़ में छुपा रहता है कोई रिश्ता अनकहा,
पर सामने आकर कभी वो प्यार नहीं करते।

आँखों में चमक दिखती है जब नाम हमारा सुनते हैं,
पर होंठों से कुछ भी कहने की कोशिश नहीं करते।
हम पूछें हाल तो मुस्कुराकर टाल जाते हैं,
दिल में जो हलचल है, वो बयान नहीं करते।

रातों को ख्वाबों में आकर पास-पास बैठते हैं,
सुबह होते ही मगर हमें पहचानते नहीं लगते।
मौसम कितना भी बदल जाए, पर उनकी आदत नहीं बदलती,
जो महसूस करते हैं, उसे जता नहीं सकते।

हमारी धड़कनों की आहट तक उन्हें आती है,
तभी तो यूँ अचानक नज़रें चुरा लेते हैं।
कोई कहे प्यार तो बस हँसकर विषय बदल देते,
दिल की दुनिया अपनी किसी को दिखा नहीं पाते।

कभी-कभी असर इतना बढ़ जाता है,
कि उनके चेहरे से भी राज़ बहक जाते हैं।
पर सवाल प्रेम का उठे तो,
वो गंभीर हो जाते, कुछ कह नहीं पाते।

हम भी समझते हैं ये दूरी उनकी मजबूरी है,
वरना नज़रों में छिपी मोहब्बत इतनी अधूरी नहीं होती।
हमारे कदमों की आहट तक वो पहचान लेते हैं,
पर कदम बढ़ाकर कभी पहल नहीं करते।



दिल उनका भी हमारे ज़िक्र पर तेज़ धड़कता है,
बस वो इस धड़कन को कभी आवाज़ नहीं देते।
मुस्कुराना उनका भी कुछ ज़्यादा हो जाता है,
जब बात हमारी होइपर वो बात स्वीकार नहीं करते।

हम सामने हों तो नज़रें झुका लेते हैं,
पर दूर से घंटों हमें निहारते रहते हैं।
रिश्ता है दिलों का, ये हम दोनों जानते हैं,
मगर वो इसे दुनिया से कहने की हिम्मत नहीं करते।

हर मुलाक़ात में छुपा होता है एक नया एहसास,
पर वो अपनी भावनाओं को पढ़ने देते नहीं हमें।
हम समझते हैं दिल की हर धड़कन उनकी,
पर वो हमें समझने का मौका खुलकर देते नहीं।

इश्क़ में उनका नाम लेना भी जैसे जुर्म हो,
ऐसा जताते, मानो कोई बात ही न हो दिल में।
लेकिन सच तो ये है कि अगर प्यार न होता,
तो यूँ रोज़-रोज़ मुस्कुराकर इनकार नहीं करते।

**सार्थक विजय पवार**
बी.एस्सी.भाग २

# अहंकार

मनुष्याच्या पतनाची खरी सुरुवात.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. समाजात राहण्यासाठी त्याला परस्पर सहकार्य, आदर आणि नम्रता यांची गरज असते. पण जेव्हा माणूस आपल्या यशाने, ज्ञानाने किंवा संपत्तीने दर्पयुक्त होतो, तेव्हा त्याच्या वागण्यातून अहंकार प्रकट होऊ लागतो. अहंकार म्हणजे 'मी' ची अतिशयोक्ती ड्ड माझ्याशिवाय कुणाचं काहीच नाही, मीच सर्वश्रेष्ठ आहे असा भ्रामक विचार मनात घर करणं. हा अहंकार मनुष्याच्या जीवनाला हानीकारक ठरतो.

अर्थ

अहंकार म्हणजे स्वतःच्या क्षमतेचा, ज्ञानाचा किंवा संपत्तीचा अनाठायी अभिमान. अहंकारामुळे मनुष्य इतरांना कमी लेखू लागतो आणि त्याचे वर्तन उद्धट बनते. अहंकाराची सुरुवात अनेकदा अज्ञानातून होते. जेव्हा एखाद्या व्यक्तीला थोडं ज्ञान मिळतं, काही यश मिळतं किंवा समाजात प्रतिष्ठा मिळते, तेव्हा त्याला वाटतं की आता मला सर्व काही माहीत आहे. पण खरी शहाणपणाची व्यक्ती आपल्याला जे माहीत नाही त्यासमोरही नम्रतेने नतमस्तक राहते. 'ज्याचे ज्ञान अधिक, त्याचा अहंकार कमी' असे एक सुंदर वचन आहे. अहंकार असलेला मनुष्य आपल्या आजूबाजूच्या लोकांना कमी लेखतो. दुसऱ्यांचं मत ऐकणं त्याला पसंत नसतं आणि त्याच्यामुळे तो हळूहळू सर्वांपासून दुरावतो.

धार्मिक आणि आध्यात्मिक विचारसरणीत अहंकाराला सर्वात मोठे पाप मानले आहे. कारण अहंकार हा मनुष्याला सत्यापासून, देवापासून आणि स्वतःच्या अंतरात्म्यापासून लांब नेतो. श्रीमद्भगवद्गीतेतही भगवान श्रीकृष्णाने अहंकार हा मनुष्याच्या विनाशाचा मुख्य शत्रू असल्याचं सांगितलं आहे. इतिहासात अनेक साम्राज्यांचा नाश, युद्धं आणि कलह हा अहंकारामुळे झालेले आहेत. रावणासारख्या विद्वान आणि बलशाली राजाचाही विनाश त्याच्या अत्याधिक अहंकारामुळेच झाला.

अहंकार मनुष्याच्या गुणांवर पडदा टाकतो. ज्या व्यक्तीमध्ये माणुसकी, प्रेमळपणा आणि सहानुभूती असते, त्या व्यक्तीचा अहंकार वाढू लागला की हे गुण मागे पडू लागतात. अहंकारी व्यक्तीकडे आपल्यापेक्षा लहान, गरीब किंवा कमी शिक्षित लोकांविषयी तुच्छतेचा दृष्टिकोन असतो. त्यामुळे नाती तुटू लागतात. कुटुंबातील सुसंवाद बिघडतो. कामाच्या ठिकाणी सहकर्मीऱ्यांमध्ये असणारा विश्वास कमी होतो. अशा व्यक्तीला समाजात खरी आदराची नाही तर खोट्या भीतीची जागा मिळते.

मानस शास्त्रानुसार, अहंकारी लोक मुख्यतः आतून कमकुवत असतात. त्यांना स्वतःची कमतरता दिसू नये म्हणून ते गर्वाचे आवरण घालतात. म्हणजेच अहंकार हा अंतर्गत भीती आणि असुरक्षिततेचा मुखवटा असतो. नम्रता ही खरी ताकद असून अहंकार ही कमकुवतपणा दाखवणारी खूण आहे. "नम्रता माणसाला उंचावते, तर अहंकार त्याला खाली खेचतो" हे वास्तव कधीही विसरता कामा नये.

अहंकाराचा परिणाम केवळ मानसिक किंवा सामाजिक नसतो, तर आध्यात्मिकदृष्ट्याही घातक असतो. अहंकारी व्यक्ती स्वतःमध्येच एवढी अडकून जाते की तिला जीवनातील सौंदर्य, आनंद आणि शांतता दिसतच नाही. स्वतःच्या गुणांचा गर्व करताना ती कृतज्ञता विसरते. तिला दुसऱ्यांचे योगदान किंवा निसर्गाचे आभार मानणेही गैर वाटते. त्यामुळे आनंदाची अनुभूतीही क्षीण होत जाते.

अहंकारावर मात करण्यासाठी प्रथम त्याचा स्वीकार करणं आवश्यक आहे. आपण कोणत्याही क्षेत्रात कितीही मोठे झालो तरी आपल्यापेक्षा महान असंख्य व्यक्ती या जगात आहेत हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. कृतज्ञता, आत्मपरीक्षण, साधेपणा आणि सकारात्मक दृष्टीकोन हे अहंकार कमी करण्याचे उत्तम मार्ग आहेत. दुसऱ्यांचा आदर करणे, त्यांचे मत ऐकणे आणि नवीन शिकण्याची तयारी ठेवणे यामुळे मनुष्य अधिक समृद्ध होतो.

एक सत्य नेहमी लक्षात ठेवावे जो माणूस जीवनात जितका मोठा होतो, तितका तो नम्र असायला हवा. कारण नम्रतेने माणूस जिंकतो आणि अहंकाराने हरतो. यश हे क्षणभंगूर असते, पण स्वभाव कायम टिकतो. आपण कसे बोललो, कसे वागलो आणि इतरांच्या मनात आपल्या बद्दल कसा भाव निर्माण झाला, हाच खरा मानवी यशाचा निकष आहे. त्यामुळे अहंकार बाजूला ठेवून, नम्रतेने आणि प्रेमाने वागणे हीच जीवनाची खरी किमया आहे.

**आनंद श्रीकृष्ण जयस्वाल**
बी.कॉम. भाग ३

# बैलपोळा

सण महाराष्ट्राचा कष्टकरी शेतकऱ्याचा
सहकारी मित्राचा !!
सण हा हिंदू परंपरेचा
प्रत्येक प्राणी जीवे संरक्षणाच्या संकल्पाचा!!

किती छान ही संस्कृती, किती छान ही परंपरा ज्या मध्ये प्रत्येक जीवाच्या उपकाराचे ऋण फेडण्यासाठी एकतरी विशेष दिवस आपण साजरा करतो. तंत्रज्ञानाने नांगरणीचे आज अनेक उपाय जरी काढलेत परंतु पर्यावरण पोषक ते नाहीत इंधन संपले की यंत्रणा बंद होऊन जातीलही परंतु ऐतिहासिक परंपरेनुसार चालत आलेली नांगरणी पद्धत म्हणजेच जी बैलजोडी द्वारे केली जाते ती पर्यावरण पोषक तसेच साधारण शेतकरी सुद्धा चांगल्या पद्धतीची शेती करून पोषक असे पीक घेऊन सुखी होतो आणि यंत्रणे मुळे जग कितीही वेगात काम करेल मात्र शेतकऱ्यांसोबत त्याचे भाव जुळणे कठिणचं !!

असो पण आनंद वाटतो की आजही काही गावाकडल्या भागांमध्ये पारंपारिक पद्धतीची शेती केल्या जाते. ज्यांच्या मुळे पर्यावरणात काही प्रमाणात पोषकता उरलेली आहे. नक्कीच बैल आणि सेंद्रिय शेती यांचे शाश्वत संबंध आहे असे आपण म्हणू शकतो. लोखंडी नांगराला जुंपून पेरणी करणे असो नांगरणे असो वा ओझेवाहक म्हणून बैलांचा वापर करणे असो मात्र हा कष्टकरी राजा कधी थकला नाही. कडक ऊन असो वा मुसळधार पाऊस असो तो कधी मुकला नाही वर्षभर अथोनात ओझ्यांचे वहन करून त्यांचे खांदे रक्ताळतात म्हणून मालक पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांचे खांदे मळतात ज्या मुळे हळदी चे औषधी गुणधर्म बैलांच्या खांद्याचा जखमा बऱ्या करतात व तूप स्निग्ध पदार्थ असल्यामुळे बैलांचा शारीरिक आरोग्य सुदृढ राहते व दुसऱ्यादिवशी त्यांचे पारंपरिक पूजन करून आपण सर्व कृतज्ञता व्यक्त करतो.

मात्र बैलांची एक दुःखद व्यथा व्यक्त करावीशी वाटते की आयुष्यभर ज्या बैलांनी आपल्याला साथ दिली त्या राज्याला म्हातारपणी आपण आपल्या स्वार्था साठी त्यांना कत्तलखानी पाठवतो, त्यांना विकतो. हा मोबदला देणे किती योग्य आहे. याचा विचार नक्की केला पाहिजे. ज्या प्रमाणे आपली आई आयुष्यभर आपल्या मुलाचा सांभाळकरून एका वया नंतर थकते. म्हातारी होते, तिच्या शरीरानी आता काही काम होत नाही, तर तिला आपण घरा बाहेर काढतो का? तिला कत्तलखानी पाठवतो का? असा वेदनादायक प्रश्न इथे निर्माण होतो !!

म्हणून हे शेतकरी राजा

या पोळ्या निमित्त पुरणाची पोळी नाही मळिाली तरी चालेल परंतु मी कत्तलखानी मरणार नाही याची हमी दे याची हमी दे हेच वचन म्हणजे माझे ऋण फेडले असे समजेल !!




**कु. आकांक्षा वर्मा**
एम.एस्सी. (झुलॉजी)

# वसुंधरा

माझी वसुंधरा निसर्गाच्या पंचतत्त्वांवर आधारित शाश्वत विकासाची चळवळ

'वसुंधरा' या शब्दाचा मूळ अर्थ 'पृथ्वी' किंवा 'धरा' असा होतो, जी संपत्ती आणि समृद्धी धारण करणारी मानली जाते. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये पृथ्वीला आदराने 'मातृवत' मानले गेले आहे, जिचे रक्षण करणे आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच मूलभूत संकल्पनेतून प्रेरणा घेऊन, महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने 'माझी वसुंधरा अभियान' (My Earth Campaign) सुरू केले आहे. २ ऑक्टोबर २0२0 रोजी सुरू झालेले हे अभियान, निसर्गाच्या 'पंचमहाभूते' (पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश) या पाच तत्त्वांवर आधारित उपाययोजनांद्वारे शाश्वत जीवनपद्धती रुजविण्यावर भर देते. या अभियानाचा उद्देश केवळ शासकीय पातळीवर कागदोपत्री काम करणे नसून, राज्यातील प्रत्येक नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका), शाळा आणि स्वयंसेवी संस्थांना एकत्र आणून एक लोकचळवळ उभी करणे हा आहे.

**अभियानाची उद्दिष्ट्ये आणि महत्त्व** –

वाढते औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि हवामान बदलाच्या गंभीर परिणामांना सामोरे जाण्यासाठी 'माझी वसुंधरा' अभियान अत्यंत महत्त्वाचे आहे. हे अभियान खालील प्रमुख उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न करते. जनजागृती: पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना कृतीशील बनवणे.

**पंचतत्त्वांचे संवर्धन** – निसर्गाच्या पाच घटकांशी संबंधित दैनंदिन मानवी जीवन आणि निसर्गाचा समतोल साधणे.

शाश्वत जीवनशैली: नागरिकांना निसर्गपूरक आणि शाश्वत जीवनपद्धती (उदा. सार्वजनिक वाहतुकीचा वापर, वृक्षारोपण, प्लास्टिक टाळणे) अंगीकारण्यास प्रोत्साहित करणे.

**स्थानिक कृती** – स्थानिक पातळीवर हवामान बदल अनुकूलन आणि शमन उपाययोजना (climate change adaptation and mitigation) प्रभावीपणे राबवणे.

**मूल्यमापन** – स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या पर्यावरणीय कामांचे मूल्यमापन करून त्यांना प्रोत्साहन देणे.

पंचमहाभूतांवर आधारित कृती आराखडा अभियानाचा गाभा 'पंचमहाभूते' आहेत. प्रत्येक तत्त्वासाठी विशिष्ट कृती क्षेत्रे आणि निर्देशक (Indicators) ठरवण्यात आले आहेत, ज्या आधारे स्थानिक संस्थांचे मूल्यांकन केले जाते.

**१. भूमी** (Earth)

भूमी संवर्धनामध्ये घनकचरा व्यवस्थापन, जमिनीचा सुयोग्य वापर आणि जैवविविधता टिकवणे यावर भर दिला जातो.

उपक्रम:

घनकचरा व्यवस्थापन: कचऱ्याचे वर्गीकरण (ओला आणि सुका कचरा), खतनिर्मिती (कंपोस्टिंग), आणि प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करणे.

वृक्षारोपण आणि संवर्धन – स्थानिक प्रजातींची झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करून हरित आवरण (Green Cover) वाढवणे.

